आदिवासी घटक कार्यक्रमांर्तगत लघु पाटबंधारे योजना (राज्यस्तर) मधून निधी वितरीत करण्याबाबत...
लेखाशिर्ष (४७०२ ७७२१)

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१८/प्र.क्र.१३/ कार्यासन ६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीखः - १६ मार्च,२०१९.

वाचा -

१) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३,दि.२.०४.२०१८ व दि.२५.०१.२०१९

२) मृद व जलसंधारण विभागाची नस्ती क्र. मजम- २०१७ / प्र.क्र.२०७/ जल-०३

शासन निर्णय :-

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत मागणी क्र. टी-६, ४७०२ लहान पांटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजना (०१)(१८)राज्य एकत्रित निधी अंतर्गत लहान पाटबंधारे योजना, राज्यस्तर योजना, (४७०२ ७७२१) ५३- मोठी बांधकामे या योजनेकरीता सन २०१८-१९ करीता एकुण रु. १०००.०० लाख तरतूद अर्थसंकल्पित आहे

२. मृद व जलसंधारण विभागाच्या वाचा क्र. २ येथील प्रस्तावास अनुसरून उपरोक्त लेखाशिर्षाखाली खालील नमूद लघू पाटबंधारे प्रकल्प चालु कामांसाठी रु.९७५.०० लाख इतका निधी प्रशासकिय विभाग प्रमुख म्हणून प्रधान सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरित करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(रु.लाखात)

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	निधी वितरण रु.
१	सांमुडी आदिवासी सहकारी उपसा जलसिंचन योजना त्र्यंबकेश्वर जि. नाशिक	२४८.००
२	हुब्यांची मेट आदिवासी उपसा सहकारी जलसिंचन योजना त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक	२६२.००
३	देवगांव आदिवासी उपसा सहकारी जलसिंचन योजना त्र्यंबकेश्वर जि. नाशिक	१५१.००
४	चंद्राची मेट आदिवासी उपसा सहकारी जलसिंचन योजना त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक	२१४.००
५	कोटरा हलबीटोला उपसा सहकारी जलसिंचन योजना, ता. सालेकसा, जिल्हा गोंदिया	५५.००
६	बिजेपार उपसा सहकारी जलसिंचन योजना, सालेकसा, जिल्हा गोंदिया	४५.००
एकूण		**९७५.००**

३. सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. विभागप्रमुख / नियंत्रण अधिकारी यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार सदर निधी याच वर्षात खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय /उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त,

आदिवासी विकास, नाशिक, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास, नाशिक तसेच मृद व जलसंधारण विभागयांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदीतुन आदिवासी उपयोजना क्षेत्रात पायाभूत सुविधा निर्माण करण्याबाबतच्या तसेच वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात फक्त वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाने **वाचा** येथील क्रमांक १ येथील परिपत्रकांन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१४१५१८२७३३२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2019.03.16 12:51:08 +05'30'

रविंद्र दि.औटे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. प्रधान सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक
४. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक.
५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
६. महालेखापाल (लेखापरिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०.मृदा व जलसंधारण विभाग, जल-०३, मंत्रालय, मुंबई.
११. कार्यासन अधिकारी, कार्यासन- २ / कार्यासन-०५, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.